एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम - १२

राज्य सेवा (मुख्य) परिक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या कामगार आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण कालावधीसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: नियुक्ती-०७२६/प्र.क्र.१८९/कामगार-८**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: ०७ ऑगस्ट, २०२६.

**संदर्भ :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: टिआरएन-२०१३/प्र.क्र. ८४/१३/१२-अ, दि. २०.०१.२०१४.

२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: टिआरएन-१११७/प्र.क्र.६६/सीपीटीपी, दि.२०.०५.२०२१.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.०१.०८.२०२५.

५) सामान्य प्रशासन विभाग, शुद्धीपत्रक क्रमांक: टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.१२.०९.२०२५.

६) सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश, क्रमांक: टिआरएन-०५२६/प्र.क्र.४३/प्रशि-२, दि. २८.०७.२०२६.

७) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: टिआरएन-०४२६/प्र.क्र.३८/प्रशि-१, दि.३१.०७.२०२६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा परिक्षेद्वारे सन २०१४ पासून प्रतिवर्षी सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ मधील संवर्गांसाठी यशदा, पुणे या संस्थेमार्फत व गट-ब मधील पदांसाठी वनामती, नागपूर या संस्थेमार्फत दोन वर्षांच्या कालावधीसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या अधिपत्याखालील कामगार आयुक्तालयातील सहायक कामगार आयुक्त, गट-अ व सरकारी कामगार अधिकारी, गट-ब संवर्गाचा समावेश संदर्भाधीन क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे संदर्भ क्रमांक ६ येथील नमूद कार्यालयीन आदेशाद्वारे सहायक कामगार आयुक्त, गट-अ या संवर्गामध्ये एकूण ०२ उमेदवारांची शिफारस सामान्य प्रशासन विभागाकडून या विभागास प्राप्त झाली आहे. सबब, सदर उमेदवारांसाठी

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) अंतर्गत अधिसंख्य पदे निर्माण करण्याची व त्यांच्या जिल्हा संलग्नतेबाबत आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ संवर्गामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक ६ येथील कार्यालयीन आदेशान्वये नियुक्ती देण्यात आलेल्या खालील तक्त्यातील स्तंभ क्रमांक ३ येथील उमेदवारांकरिता वेतनस्तर एस-१८ (रु.४९१००-१५५८००) मध्ये एकूण ०२ अधिसंख्य पदे दि.१०.०८.२०२६ रोजी पासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी कामगार आयुक्तालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्याकरिता याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच, सदर उमेदवारांना प्रशिक्षणाकरिता स्तंभ ५ मध्ये नमूद जिल्हा व स्तंभ क्र. ६ मध्ये नमूद कार्यालय वाटप करण्यात येत आहे. त्यानुसार स्तंभ क्र. ३ येथील प्रशिक्षणार्थी उमेदवारांनी दिनांक १०.०८.२०२६ रोजी (म.पू.) उक्त कार्यालयात रुजू व्हावे.

**सहायक कामगार आयुक्त, गट-अ**

| **अ.क्र.** | **म.लो.आ. अ. क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **स्व जिल्हा** | **वाटप केलेला जिल्हा** | **कार्यालय** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | १ | श्री. रोहित दिलीपराव जोगस | पुणे | बृहन्मुंबई | कामगार आयुक्तालय, मुंबई. |
| २ | २ | श्री. अजय अनिल तोडकर | कोल्हापूर | बृहन्मुंबई | कामगार आयुक्तालय, मुंबई. |

२. कामगार आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ संवर्गातील एकूण ०२ अधिसंख्य पदांच्या प्रत्यक्ष रुजू दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीतील वेतनावर येणारा खर्च या विभागाच्या वेतनविषयक लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश, दि.२८.०७.२०२६ अन्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) साठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थींच्या वेतनाबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या कामगार आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ संवर्गातील ०२ उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीतील वेतनासंदर्भात कामगार आयुक्त, कामगार आयुक्तालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखाधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

४. सीपीटीपी-१२ अंतर्गत प्रशिक्षणासाठी रुजू होणाऱ्या परिविक्षाधीन सहायक कामगार आयुक्त, गट-अ यांना ते प्रशिक्षणासाठी ज्या दिनांकापासून ते रुजू झाले त्या दिनांकापासून नियमित वेतन इतर

अनुषंगिक भत्ते प्रदान करणे, उपरोक्त अधिकाऱ्यांची सेवापुस्तके तयार करणे, सेवार्थ प्रणालीमध्ये नोंदणी करणे, त्यांचे एनपीएस करीता खाते उघडणे, अन्य अनुषंगिक बाबी पूर्ण करणे इ. अनुषंगिक कार्यवाही तातडीने करण्याची जबाबदारी कामगार उप आयुक्त (प्रशासन), कामगार आयुक्तालय, मुंबई यांचेवर सोपविण्यात येत आहे.

५. उपरोक्त परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना निम्न संवर्गाचा स्वतंत्र कार्यभार व नियुक्तीच्या पदाचा स्वतंत्र कार्यभार देण्याबाबत शासन स्तरावरुन स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

६. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात येत आहे.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०७१४४६५७९०५४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JIREWAR SHRINIVAS DATTATRAY

Digitally signed by JIREWAR SHRINIVAS DATTATRAY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=42139AF095588A908DB2916824EF6535970D3AF8D589339252EF98696D4E0256, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D151C0F56009AFC3BB3618879DFEE67817426CBEE059F11116E801CAE1B9CF72, cn=JIREWAR SHRINIVAS DATTATRAY
Date: 2026.08.07 14:47:44 +05'30'

**(श्रीनिवास जिरेवार)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

कामगार आयुक्त, कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

**प्रत:-**

१. महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
३. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
४. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे.
८. उप सचिव( प्रशा-१), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव (प्रशि-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव (वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. लेखा अधिकारी, कामगार आयुक्तालय, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१४. श्री. रोहित दिलीपराव जोगस, परिविक्षाधीन सहायक कामगार आयुक्त.
१५. श्री. अजय अनिल तोडकर, परिविक्षाधीन सहायक कामगार आयुक्त.
१६. निवडनस्ती, (कामगार-८)